दोन पिस्तुलांसह काडतुसे जप्त

पुणे : बेकायदा देशी बनावटीची पिस्तूल बाळगणाऱ्या अजिम ऊर्फ आंट्या मोहम्मदहुसेन शेख (वय २५, रा. सय्यदननगर, हडपसर) याला काळेपडळ पोलिसांनी अटक केली. सराइताकडून दोन पिस्तुलांसह चार काडतुसे जप्त करण्यात आली.

अजिम शेख हा महंमदवाडी भागात थांबल्याची माहिती तपास पथकातील पोलीस कर्मचारी नासीर देशमुख यांना मिळाली. शेख गंभीर गुन्ह्याच्या तयारीत असताना पोलिसांच्या पथकाने सापळा लावून त्याला पकडले. त्याच्या झडतीत देशी बनावटीचे दोन पिस्तुले, तसेच चार काडतुसे जप्त करण्यात आली. त्याने पिस्तुले, तसेच काडतुसे कोणाकडून आणली, याचा तपास करण्यात येत असल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक मानसिंग पाटील यांनी दिली.

परिमंडळ पाचचे पोलीस उपायुक्त डॉ. राजकुमार शिंदे, सहायक आयुक्त धन्यकुमार गोडसे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक मानसिंग पाटील, गुन्हे शाखेचे निरीक्षक अमर काळंगे, सहायक निरीक्षक अमित शेटे, हवालदार दाऊद सय्यद, प्रतीक लाहिगुडे, युवराज दुधाळ, प्रवीण काळभोर, श्रीकृष्ण खोकले, सद्दाम तांबोळी, महादेव शिंदे, अतुप पंधरकर, शाहिद शेख, नितीन ढोले यांनी ही कामगिरी केली.

OMKARA ASSETS RECONSTRUCTION Pvt. Ltd.

ओमकारा ॲसेटस् रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड

कॉर्पोरेट कार्यालय : कोहिनूर स्क्वेअर, 47 वा मजला, एन. सी. केळकर मार्ग, आर. जी. गडकरी चौक, दादर पश्चिम, मुंबई 400 028. संपर्क क्र. - 9773406175.

अचल मालमत्तांच्या विक्रीसाठी विक्री सूचना

[9(1) सह वाचलेल्या नियम 8(6) ची तरतूद पाहावी]

सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील 9(1) सह वाचलेल्या नियम 8(6) च्या तरतुदीसह वाचण्यात येणाऱ्या सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल ॲसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 अंतर्गत अचल मत्तांच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना.

याद्वारे कर्जदार दशरथ जी बोड्डू आणि सह-कर्जदार रोहिणी दशरथ बोड्डू यांना आणि सर्व लोकांना सूचित करण्यात येते की सुरक्षित धनको कडे तारण / भारग्रस्त असलेल्या खालील वर्णनाच्या अचल मालमत्तेचा ओमकारा एआरसी, सुरक्षित धनको च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी दि. 07.08.2024 रोजी प्रत्यक्ष ताबा घेतलेला असून वर नमूद कर्जदार व सह-कर्जदारांकडून मे. ओमकारा ॲसेटस् रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड सुरक्षित धनको यांना 28.02.2020 रोजी नुसार घेणे असलेल्या **रु. 20,50,566.70/- (रुपये वीस लाख पन्नास हजार पाचशे सहासष्ट आणि सत्तर पैसे फक्त)** अधिक तसेच आनुषंगिक खर्च, शुल्क इत्यादींसह कराराच्या दराने जमा झालेले व्याज / अवास्तव व्याज या रकमेच्या वसुलीसाठी दि. 08.05.2025 रोजी सकाळी 11.00 वा. (बोली सादर करण्याची अंतिम दिनांक आणि वेळ 07.05.2025 सायंकाळी 6.00 पर्यंत आहे), ''जशी आहे जेथे आहे'', ''जशी आहे जे काही आहे'' आणि ''तेथे जे काही आहे'' आणि ''कुठलाही उपाय नाही'' तत्त्वावर विक्री करण्यात येईल.

ओमकारा ॲसेटस् रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड (ओमकारा पीएस 33/2020-21 ट्रस्ट चे ट्रस्टी म्हणून काम पाहणारे) यांनी दि. 30.03.2021 रोजीच्या अभिहस्तांकन करारान्वये एडलवाईस हाऊसिंग फायनान्स लिमिटेड (ईएचएफएल) यांचेकडून खाली नमूद कर्जदार / सह-कर्जदार / जामीनदारांकडून घेणे असलेली संपूर्ण थकबाकी कर्जे त्यांमधील अंतर्निहित अनामतीसह अधिग्रहित केली आहेत. त्यामुळे, ओंकारा ?सेट्स रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड ने एडलवाईस हाऊसिंग फायनान्स लिमिटेड (ईएचएफएल) ची जागा घेतली आहे आणि त्यांना संपूर्ण थकबाकी वसूल करण्याचा आणि सिक्युरिटीजची अंमलबजावणी करण्याचा हक्क आहे.

अचल मालमत्तांचे वर्णन, आरक्षित किंमत आणि बयाणा रक्कम तसेच ज्ञात बोजे (असल्यास) खालीलप्रमाणे आहेत :

मालमत्तेचे वर्णन	आरक्षित किंमत	बयाणा रक्कम
फ्लॅट-8, चौथा मजला, गोल्डन स्टोन बिल्डिंग, सीटीएस क्र. 41, डोकी मारुती मार्ग, नाना पेठ, गणेश पेठ, पुणे 411002 येथे स्थित. **चतुःसीमा :** उत्तर : इतर इमारत, दक्षिण : इतर मालमत्ता, पूर्व : डोकी मारुती मार्ग, पश्चिम : इतर इमारत. (बोली वृद्धी : रु. 25,000/-)	रु. 19,44,000/-	रु. 1,94,400/-

ई-लिलाव दिनांक :	08.05.2025 रोजी स. 11.00 ते दु. 2.00 वा.
सहभागी होण्याचे बोली पत्र जमा करण्याची केवायसी दस्तावेज / बयाणा रकमेचा पुरावा सादर करण्यासाठी शेवटचा दिनांक व वेळ	07.05.2025 रोजी सायं. 6:00 पर्यंत
पाहणी दिनांक	26.04.2025 रोजी दु. 1.00 ते दु. 4.00 दरम्यान
ज्ञात दायित्वे	ज्ञात नाही

हे प्रकाशन उपरोक्त कर्जदार / सह-कर्जदार यांना सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील 9(1) सह वाचलेल्या नियम 8(6) अंतर्गत पंधरा दिवसांची सूचना देखील आहे.

विक्रीच्या तपशीलवार अटी व शर्तीसाठी कृपया सुरक्षित धनकोच्या वेबसाइटवर प्रदान केलेल्या लिंकचा म्हणजे http://omkaraarc.com/auction.php चा संदर्भ घ्या. आणि प्राधिकृत अधिकारयांचे संपर्क तपशील : प्रतीक्षा पटेल (संपर्क क्र. 9773406175 आणि राजेंद्र देवर्डे - 9324546651 आणि ईमेल - pratiksha.patel@omkararc.com बोलीदार http://www.bankeauction.com या वेबसाइटला देखील भेट देऊ शकतात किंवा सेवा पुरवठादार मे. सी1 इंडिया प्रा. लि., टेली. हेल्पलाईन : +91-7291981124/ 25/ 26, हेल्पलाईन ई-मेल आयडी : support@bankeauctions.com, श्री. भाविक पंड्या, मोबाईल : 88666 82937 ईमेल : Maharashtra@c1india.com यांचेशी संपर्क साधावा. नादारी आणि दिवाळखोरी संहिता 2016 च्या कलम 29ए अंतर्गत इच्छुक बोलीदारांनी त्याचे पालन करावे आणि घोषणा करावी.

दिनांक : 19.04.2025
स्थान : पुणे

स्वा/- प्राधिकृत अधिकारी, (प्रतीक्षा पटेल)
ओमकारा ॲसेटस् रिकन्स्ट्रक्शन प्रा. लि.
(ओमकारा पीएस 33/2020-21 ट्रस्ट चे विश्वस्त म्हणून त्याच्या क्षमतेनुसार कार्यरत)

नवा अभ्यासक्रम लागू करताना मोठी कसरत

शिक्षण विभागापुढे आव्हानांचा डोंगर

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : शिक्षण विभागाने शैक्षणिक वर्ष २०२५-२६पासून राज्यातील राज्य मंडळाच्या शाळांमध्ये राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०ची अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र, या धोरणाची अंमलबजावणी करताना एका वेळी अनेक इयत्तांचा अभ्यासक्रम आणि पाठ्यपुस्तके तयार करणे, पाठ्यपुस्तकांचा दर्जा राखणे, नवा अभ्यासक्रम शिकवण्यासाठी शिक्षकांना प्रशिक्षण देणे, सुधारित मूल्यमापन पद्धती विकसित करणे, अध्यापनाच्या अभिनव पद्धतींचे प्रशिक्षण अशी अनेक आव्हाने शिक्षण विभागासमोर असल्याचे तज्ज्ञांचे म्हणणे आहे.

राज्य अभ्यासक्रम आराखड्यानुसार तयार केलेल्या नव्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी चार वर्षांत टप्प्याटप्प्याने केली जाणार आहे. त्यानुसार २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात इयत्ता पहिलीला नवा अभ्यासक्रम लागू होईल. २०२६-२७ मध्ये दुसरी, तिसरी, चौथी, सहावी या वर्गांना, २०२७-२८ मध्ये पाचवी, सातवी, नववी, अकरावी या वर्गांना, तर २०२८-२९ मध्ये आठवी, दहावी आणि बारावी या वर्गांना नवा अभ्यासक्रम लागू करण्यात येणार आहे. त्यामुळे २०२५-२६ हे वर्ष वगळता उर्वरित तीन वर्षांमध्ये तीन ते चार वर्गांना एकाच वेळी नव्या अभ्यासक्रमाची पाठ्यपुस्तके उपलब्ध करावी लागणार आहेत.

येत्या शैक्षणिक वर्षात पहिलीला नवा अभ्यासक्रम लागू करण्यात येईल. त्यानंतर उर्वरित इयत्तांना नवा अभ्यासक्रम उपलब्ध करून दिला जाईल. त्यासाठीची पाठ्यपुस्तके तयार करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. नवा अभ्यासक्रम लागू झाल्यावर पुन्हा जुना अभ्यासक्रम शिकावा लागू नये, अशा पद्धतीनेच काम करण्यात येत आहे. त्यामुळे दर्जेदार पाठ्यपुस्तके तयार करण्यात येतील. त्याशिवाय शिक्षकांचे प्रशिक्षण सुरू करण्यात आले आहे. त्यासाठीचा निधीही मंजूर आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरण शाळा स्तरावर लागू करण्यात अडचण येणार नाही.

- राहुल रेखावार, संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद

माजी मुख्याध्यापक महेंद्र गणपुले म्हणाले, 'राष्ट्रीय शिक्षण धोरणात शालेय शिक्षणाची ५-३-३-४ अशी नवी रचना करण्यात आली आहे. त्यानुसार नवा अभ्यासक्रम येत्या शैक्षणिक वर्षात पहिलीला लागू करण्यात येणार आहे. त्यानंतर टप्प्याटप्प्याने पुढील तीन वर्षांत अन्य इयत्तांनाही नवा अभ्यासक्रम लागू केला जाईल. मात्र, त्यापूर्वी शिक्षण विभागाला विविध आव्हानांची पूर्तता करावी लागणार आहे. पाठ्यपुस्तकांची निर्मिती वेळेत करावी लागणार आहे. तसेच शिक्षकांचे प्रशिक्षण, अद्ययावत मूल्यमापन पद्धती, पुरेसे शिक्षक उपलब्ध करण्यासाठी पदभरती पूर्ण करणे महत्त्वाचे आहे. त्याशिवाय सुधारित संचमान्यता, मूलभूत भौतिक सुविधांची उपलब्धता, शाळांना वेतनेतर अनुदान, व्यवसाय शिक्षणाची पुढील दिशा स्पष्ट करून त्यासाठीच्या भौतिक सुविधांची उपलब्धता याबाबतही काम होणे आवश्यक आहे.

शिक्षण विभागाने दिलेल्या माहितीनुसार, नवा अभ्यासक्रम टप्प्याटप्प्याने लागू करण्यात येणार आहे. मात्र, एका वेळी चार इयत्तांची पाठ्यपुस्तके तयार करणे आव्हानात्मक काम आहे. त्यासाठी पुरेशा सुविधा आणि वेळ द्यायला हवा. मात्र, त्याआधी अभ्यासक्रम तयार असणे ही प्राथमिक बाब आहे, याकडे बालभारतीच्या माजी विद्या सचिव धनवंती हर्डीकर यांनी लक्ष वेधले.

सावकाराच्या त्रासामुळे तरुणाची आत्महत्या

पुणे : बेकायदा सावकारी करणाऱ्या एकाच्या त्रासामुळे तरुणाने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. आत्महत्या केलेल्या तरुणाच्या पत्नीचे सावकाराबरोबर अनैतिक संबंध होते. अनैतिक संबंध, तसेच सावकाराच्या त्रासामुळे तरुणाने आत्महत्या केल्याची तक्रार दाखल झाल्यानंतर सावकारासह तरुणाच्या पत्नीलाही अटक करण्यात आली.

आत्महत्याप्रकरणी तरुणाच्या बहिणीने याबाबत काळेपडळ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी सांगितले, तरुणाने सावकाराकडून व्याजाने पैसे घेतले होते. या व्यवहारानंतर सावकाराची आणि तरुणाच्या पत्नीची ओळख झाली. त्यानंतर दोघांमध्ये अनैतिक संबंध निर्माण झाले होते. व्याजाने दिलेल्या पैशांसाठी तगादा लावल्याने तरुणाने गुरुवारी (१७ एप्रिल) राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली.

द्रुतगती मार्गावर कोंडी

- सलग सुट्ट्यांमुळे मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर शुक्रवारी कोंडी झाली.
- मोठ्या संख्येने पर्यटक बाहेर पडल्याने द्रुतगती मार्गावर पहाटेपासून कोंडी पाहायला मिळाल्याने वाहतूक विस्कळीत झाली.
- खंडाळा घाटात सात ते आठ किलोमीटरपर्यंत वाहनांच्या रांगा लागल्या होत्या.
- गुड फ्रायडेच्या सुटीला जोडून शनिवारी आणि रविवारी सुटी आल्याने मुंबई परिसरातील पर्यटक मोठ्या संख्येने लोणावळा, खंडाळा परिसरात दाखल झाल्याने गर्दीत भर पडली.

पुलाच्या कठड्यावर रिक्षा आदळून तरुणाचा मृत्यू

रिक्षाचालकासह अल्पवयीनाविरुद्ध गुन्हा

पुणे : कात्रज-कोंढवा रस्त्यावरील पुलाच्या कठड्यावर रिक्षा आदळून प्रवासी तरुणाचा मृत्यू झाला. रिक्षाचालकाने अल्पवयीनाच्या ताब्यात रिक्षा चालविण्यास दिल्याने अपघाताची घटना घडल्याची माहिती पोलिसांनी दिली. याप्रकरणी चालकासह अल्पवयीनाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

रितेश शिवाजी गायकवाड (वय १९, रा. गोकुळनगर, कात्रज-कोंढवा रस्ता) असे मृत्यमुखी पडलेल्याचे नाव आहे. पोलिसांनी सांगितले की, रिक्षाचालक जालिंदर बबन साळुंके (वय ३५, रा. कात्रज) हा रिक्षा चालवत होता. यावेळी त्याने अल्पवयीन मुलाला रिक्षा चालवण्यास दिली. याप्रकरणी पोलीस शिपाई विठ्ठल चिपाडे यांनी या संदर्भात भारती विद्यापीठ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

अल्पवयीन मुलाचे भरधाव रिक्षावरील नियंत्रण सुटल्याने रिक्षा पुलाच्या कठड्यावर आदळली. अपघातात रिक्षातील तरुण रितेश गायकवाड गंभीर जखमी झाला. उपचारांदरम्यान त्याचा मृत्यू झाला. याप्रकरणी सहायक पोलीस निरीक्षक शेंडे तपास करत आहेत.

ट्रकच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू

ट्रकच्या धडकेत दुचाकीस्वार तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना नगर रस्त्यावर घडली. महेश मनोहर चव्हाण (वय २८, रा. साजूर, कराड, जि. सातारा) असे मृत्युमुखी पडलेल्या तरुणाचे नाव आहे. ट्रकचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत नीलेश सुर्वे यांनी विमानतळ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. दुचाकीस्वार चव्हाण हे बुधवारी रात्री साडेअकराच्या सुमारास नगर रस्त्याने निघाले होते. खराडी बाह्यवळण मार्ग चौकात भरधाव ट्रकने दुचाकीस्वार चव्हाण यांना धडक दिली.

पाच लाखांचा ऐवज चोरीला

पुणे : हडपसर भागातील मांजरी भागात घराचे कुलूप तोडून चोरट्यांनी रोकड, सोन्याचे दागिने असा पाच लाख रुपयांचा ऐवज चोरून नेल्याची घटना घडली.

याबाबत वैशाली रमेश देवकुळे (वय ४०, रा. मांजरी) यांनी हडपसर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी सांगितले, देवकुळे यांचे घर बंद होते. कपाटातील सोन्याचे दागिने, रोकड असा ऐवज चोरून नेला.

एटीएमची तोडफोड : मांजरी भागातील बेल्हेकर वस्ती परिसरात एका बँकेच्या एटीएमची मोडतोड करून रोकड चोरण्याचा प्रयत्न करण्यात आला. याची फिर्याद दाखल झाली.

मराठी साहित्य महामंडळाचाही आक्षेप

(पान १ वरून)

विभागाने बुधवारी प्रसिद्ध केला. त्यानुसार पहिलीपासून अभ्यासक्रमात हिंदी विषयाचा समावेश करण्यात येणार आहे. अभ्यासक्रम आराखड्यासाठी नियुक्त केलेल्या सुकाणू समितीने हिंदी भाषेची सक्ती न करता अन्य भारतीय भाषांचा पर्याय उपलब्ध करून देण्याची शिफारस केली होती. मात्र, ही शिफारस डावलून शिक्षण विभागाने तिसरी भाषा म्हणून पहिलीपासूनच हिंदी विषय सक्तीने शिकवण्याचा निर्णय घेतल्याचे समोर आले आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी हिंदी सक्तीविरोधात भूमिका घेतली आहे. तसेच, अन्य राजकीय पक्ष, शिक्षण क्षेत्रांतूनही या निर्णयाविरोधात तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत. त्याबरोबरच आता साहित्य क्षेत्रातूनही पहिलीपासून हिंदी शिकवण्यास विरोध दर्शवण्यात आला आहे.

'शासनाने इयत्ता पहिलीपासून हिंदीची सक्ती करण्याचा निर्णय तत्काळ रद्द केला पाहिजे. कारण तो अन्याय करणारा आहे. मराठी भाषा शिक्षणाचा कायदा सक्तीचा करण्यासाठी लढा द्यावा लागला हे वास्तव आहे,' असे अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी यांनी सांगितले. अशा परिस्थितीत हिंदी प्रेम कशासाठी, शासनाने मराठी भाषा सल्लागार समिती स्थापित केली आहे. हा मोठा निर्णय घेताना त्या समितीलाही शासनाने विचारले नाही यासारखे दुर्दैव कोणते, असे प्रश्नही त्यांनी उपस्थित करत अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ या सक्ती विरोधात तीव्र आंदोलन करेल, असेही त्यांनी नमूद केले.

हिंदी सक्तीविरोधात मनसेचे आंदोलन

राज्यातील शाळांमध्ये पहिलीपासून हिंदी भाषा अनिवार्य करण्याच्या शालेय शिक्षण विभागाच्या विरोधात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेतर्फे आंदोलन करण्यात आले. 'संपर्कसूत्र म्हणून हिंदी भाषा शिकवली पाहिजे,' या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या भूमिकेचाही तीव्र निषेध करण्यात आला. राज्य शासनाने शासन निर्णय मागे न घेतल्यास शहरात एकही हिंदी पुस्तक छापू देणार नाही, सक्तीने हिंदी शिकवणाऱ्या शाळांना टाळे ठोकण्याचा इशाराही देण्यात आला. आंदोलनावेळी मनविसेचे शहराध्यक्ष धनंजय दळवी, राज्य संघटक प्रशांत कनोजिया, राज्य उपाध्यक्ष ॲड. सचिन पवार, मनसे कामगार सेना राज्य उपाध्यक्ष नरेंद्र तांबोळी, विभाग अध्यक्ष सुनील कदम, राज्य कार्यकारिणी सदस्य अभिषेक थिटे, शहर उपाध्यक्ष विक्रांत भिलारे आदी या वेळी उपस्थित होते.

लोकसत्ता Classifieds
FROM ANYTHING TO EVERYTHING.

शैक्षणिक

सुवर्णसंधी! 1 वर्षात BA व्हा. 10वी/12वी पास- नापासना प्रवेश. सरकारमान्य समकक्ष पदवी. - डॉ. कानडे, बावधन, पुणे (11 ते 5) 9890344036/ 9890976469
0090374605-2

पाहिजेत

शासनमान्य कंपनीत निवृत्त/ VRS/ सुशिक्षित गृहिणींना अर्ध/ पूर्ण वेळ काम. संधी पगार+PF+मेडिक्लेम मिळवण्याची. वयः 25-65. पदमाः 9960910054
0070962282-1

मॅरेज ब्युरो

सुप्रसिद्ध सौ. कुळकर्णी विवाहसंस्थेत नाव नोंदवा. ४२ वर्षांची परंपरा, लाखो विवाह जुळविण्याचा अनुभव. सर्व जातींची उच्चशिक्षित स्थळे उपलब्ध. 8369692734/ 9892625606.
0070934850-11

जागाविषयक

कोल्हापूर/ रत्नागिरी जिल्ह्यात १ एकरपासून २०० एकरपर्यंत बागायत व जिरायत जमीन ३ लाखापासून १ एकर सुरुवात. मो. 9021258784.
0070962681-1

'सुवर्णसंधी'तळेगाव दाभाडे स्टेशनपासून चालत 10 मिनिटांच्या अंतरावर 1BHK 28.50 आणि 2BHK 39 लाखांपासून उपलब्ध. 2 लाखापर्यंतची सूट, कर्जाची सोय. भिडे लाईफस्टाईल वर्ल्ड 8108119803 / 8108119804.
0090373274-1

दापोलीत सर्व सुविधांसह सीव्ह्यू NA प्लॉटस १/२ BHK बंगलो, पाणी, लाईट, रोड, कंपाऊंड, WI-FI, 7/12, बँक लोन स्टॅम्पड्युटीमध्ये सुट ऑफर सुरू - ९५९५०१५०००, www.greatkonkan.com
0090368953-1

Office For Lease In Baner Pune Pride Gateway Fully Furnished 1620 sw ft Owner Vishal 9890222720 .
0050264530-1

मालमत्तासंबंधी

Row House for sale at alibaug city, 108 sq.m. 1100 sq.ft.. construction fullly renovated, price 1CR. 10 mins walk from S.T.Stand and sea shore.Contact 9623410710 8530410568
0090375006-1

मालमत्ताविषयक

* निनाद कन्स्ट्रक्शन * सिंधुदुर्ग जिल्ह्यात कणकवली बाजारपेठेपासून हाकेच्या अंतरावर रो हाऊस उपलब्ध. ८०% काम पूर्ण. संपर्क व्हाट्सअप- 9822132134/ 9423242134.
0070962638-1

जाहिरातविषयक

HIGHTECH, Experts, Quick Service (Sarvodaya Advertising) लोकसत्ता+ सर्वच वर्तमानपत्रांत स्कीम+ डिस्काउंट विवाहविषयक, जागाविषयक, श्रद्धांजली, शैक्षणिक, पाहिजेतच्या जाहिराती प्रसिद्धीसाठी. 9892797851/ 9322277986.
0070952089-1

यात्रासहल

देशपांडे ट्रॅव्हल्स
रेल्वे रिझर्व्हेशन ७५ दिवस अगोदर
9820962500 9819453043
चारधाम यात्रा
बद्रीनाथ-केदारनाथ यमुनोत्री-गंगोत्री हरिद्वार-ऋषिकेशसह
13 दिवस, 5, 15, 26 मे, 5, 16 जून, 34,500/- प्रत्येकी
दिल्ली ते दिल्ली विमान प्रवास 46,500/-
वैष्णोदेवी-काश्मिर अमृतसरसह 2, 9, 16, 23 मे
35,500/- प्रत्येकी रेल्वे प्रवास 3 टायर एसी (13 दिवस)
51,500/- प्रत्येकी विमान प्रवास (वैतागता) (10 दिवस)
काश्मिर-वैष्णोदेवीसह
11 दिवस, 3, 10, 17, 24 मे, 29,500/- प्रत्येकी
अमृतसर-डलहौसी धरमशाला-खजियारसह
8 दिवस, 5, 17, 23, 29 मे, 3 टायर एसी, 24,500/- प्रत्येकी
सिमला-कुलू-मनाली चंदीगडसह 10 दिवस, 17, 25 मे, 3 टायर एसी राजधानी, 31,500/- प्रत्येकी
लेह-लडाख कारगिल-काश्मिरसह
14 दिवस, 24, 31 मे, 7 जून, 3 टायर एसी, 45,501/- प्रत्येकी
अष्टविनायक-जेजुरी प्रतिबालाजी-आळंदीसह
दर शुक्रवारी, इकॉनॉमिक 3,151/- स्वतंत्र रुम 3,951/-, एसी बस व एसी रुम 5,551/-
पंढरपूर-तुळजापूर गाणगापूर-अक्कलकोट
दर गुरुवारी, इकॉनॉमिक 3,351/-, स्वतंत्र रुम 4,151/-, एसी बस, नॉन-एसी रुम 5,551/-
गणपतीपुळे-पावस मार्लेश्वर-डेरवण-रत्नागिरी
दर गुरुवारी, इकॉनॉमिक 4,151/- एसी बस, नॉन-एसी रुम 5,551/-
कोल्हापूर-ज्योतिबा नरसोबाची वाडी-पन्हाळा कन्हेरी मठ-बाळू मामासह
स्वतंत्र रुम 5,551/- 17, 24 एप्रिल
गोवा-गणपतीपुळेसह
5 दिवस, 27 एप्रिल, 4, 11, 18, 25 मे, 1, 8 जून एसी बस, नॉन-एसी रुम 7,551/- प्रत्येकी
www.deshpandetours.com
0070961391-6-1

जाहिरात छोटी प्रतिसाद मोठा

* प्रवासी टूर्स * स्वस्त-मस्त किचन युनिटसह * चारधाम यात्रा यमुनोत्री-गंगोत्री- केदारनाथ-बद्रीनाथ- उत्तर काशी-पंच प्रयाग. २५ जून (१३ दिवस) २४,५००/- * श्रावण मास- उज्जैन-ओमकारेश्वर- इंदौर १०,५००/- 3 AC रेल्वे प्रवास २९ जुलै (६ दिवस) * 9082588511/ 9322022096.
0070949012-2

दोस्तीटूर *चारधामयात्रा *नेपाळ *भूतान *सिमला-मनाली *नैनिताल *काश्मीर *अमरनाथयात्रा *लेह-लडाख *नर्मदापरिक्रमा *कुरवपुर-पिठापुरम, श्रीदत्तपरिक्रमा *राजस्थान *केरळ *कोस्टल कर्नाटका. 9594880123/ 9702251584
0070915287-18

भविष्यविषयक

ॲस्ट्रॉलॉजी : गोल्ड मेडलिस्ट, जन्मकुंडली बनविणे, जुळविणे, जन्मकुंडलीवरून तसेच हस्तरेषा- चेहरा, फोटोवरून आपल्या प्रश्नांवर सविस्तर भविष्य तसेच/ वास्तुशास्त्राचे महत्त्व. वास्तुशांतीचे साधे-सोपे उपाय ५० पानांवर लिहून मिळतील. पाहिजे असल्यास हिंदी/ इंग्रजीमधून लिखाण मिळेल. (प्रश्नांची फी एकदाच सुरुवातीला स्वीकारतो.) नवग्रहांचे रत्ने, भाग्योदय यंत्रे, रुद्राक्ष इतर शुभवस्तू सुचवितो व अनुष्ठान करून दिले जातील. मुख्य कार्यालय श्री. सुधाकर सदानंद जोशी, कु. यशश्री सुधाकर जोशी. सोमवार ते शनिवार सकाळी १० ते संध्याकाळी ६. योगी निवास बंगला, पहिला मजला, किसन क्रॉस रोड, नवीन पोलीस क्वार्टर्सजवळ, मालाड (पश्चिम), मुंबई-४०००६४. 9820553276/ 9820612578. (वरील पत्त्याशिवाय आमची कुठेही शाखा अथवा प्रतिनिधी नाहीत.)
0070950385-1

वॉटरप्रूफिंग

Without Breaking Toilet, Bathroom, 5Years Guarantee, Terrace 10Yrs Guarantee,All Leakage Work, Free Visit Authorized Applicator Dr.Fixit 9225534110/76667299110
0090371586-1

वृद्धाश्रम/सेवासंस्था

सरकारमान्य नामांकित संस्थेला वृद्धाश्रमासाठी डोनेशनमध्ये जागा पाहिजे आहे संपर्क 7039024175/ 9326684309
0070960287-1

नावात बदल

दि 16/03/2025 रोजच्या प्रतिज्ञापत्र क्र 13/2025 व्दारे तसेच माझे विवाह नंतर मी माझ्या भविष्यातील सर्व कामांसाठी माझे नाव अन्नमा जोसेफ हे बदलून अनु सेबी थाट्टिल चीनिकाल असे केलेले आहे
0090375029-4

माझे जुने नाव शोभा दिनेश भुवा हे बदलुन नवे नांव भारती दिनेश भुवा हे धारण केले आहे. संदर्भ आधार कार्ड.
0090375024-2

I, Smt Anuradha, spouse of No. 2776934K, Rank- Ex Hav, Name- Sambhaji Parashram Bhosle, resident of Vill- Agran Dhulgaon, Post- Agran Dhulgaon, Tehsil- Kavathe Mahankal, Dist- Sangli, have changed my name from Anuradha to Anuradha Sambhaji Bhosale. Vide affidavit No. 2998 dated 15 April 2025 before The Taluka Executive Magistrate, Kavathe Mahankal.
0090375015-7

I Indra Bai Widow of No- 1545888Y Ex-Hav(Late) Vishnu Dhondu Jadhav residing at Ashele, Tehsil-Ambarnath, Distt- Ulhasnagar 421004 have changed my name from Indra Bai to Indra Bai Vishnu Jadhav and DOB 01/01/1966 to 03/09/1961 vide Affidavit 1149105/2025 of 15/04/2025
0040784662-1

I Nilam Dinesh Wagh wife of No-13623622L Ex-NK Wagh Dinesh Vijay Singh residing at Aghar (Khurd), Teh- Malegaon Distt-Nashik have changed my date of birth from 23/10/1985 to 23/08/1985 vide Affidavit 64/2025 of 16/04/2025
0040784664-1

I Prtibha wife of JC- 257911Y Ex-Nb Sub Ingulkar Ganpat Dhondiba residing at Kamthadi Bhor Pune have changed my name from Prtibha to Pratibha Ganpat Ingulkar vide Affidavit 62/2025 of 16/04/2025
0040784665-1

I, Ashwini, wife of No. JC-459922N Ex Sub Shigvan Anil Tukaram, Resident at Vill & PO- Shigvan Wadi Kherdi, Teh- Chiplun, Dist- Ratnagiri (MH) 415604, have changed my name from Ashwini to Ashwini Anil Shigvan & my correct DOB is 01/03/1977 & not 01/02/1977 vide affidavit no. 4180/2025 at Kolhapur
0090375015-3

My Old name was Jayvanti Kacheshwar Rajguru now Change after marriage to new name Geeta Dhananjay Kale vide affidavit no A/417/2025 dtd 17/04/2025.
0090375027-1

I Krishna Bai Wife of JC- 125820M Ex-Nb Sub Shivaji Chavan have changed my name from Krishna Bai to Krishnabai Shivaji Chavan and DOB 17/08/1954 to 21/07/1954 vide Affidavit 5736/2025 of 17/04/2025
0040784660-1

My previous Name Afroznas I have changed my Name Afroz Javed Khan as per Affidavit No. 500/25
0090375029-1

My old name Dhiraj Vijaykumar Bora has changed to new Dhiraj Vijay Bora as per affidavit No. 42/2025 dated 16/04/2025
0090375022-1

MY OLD NAME PRADEEP KUMAR GURNANI CHANGE TO MY NEW NAME PRADEEP GURNANI
0090374947-4

I, no - 15421424K. HAV. Barge Deepak Machindranath. That i have changed my name from Barge Deepak Machindranath to Barge Deepak Machhindra. Vide Affidavit no - 255274262126850109457 1 .Dated -15/04/2025
0090375026-3

I, Shobha, wife of No. 2782505Y Ex Nk(TS) Patil Shrirang Shamrao, Resident at B-203 Seeta Laxmi CHSL, Pakhadi Kharegaon Kalwa West, Dist- Thane (MH) 400605, declare that my name changed from Shobha to Shobha Shrirang Patil as per affidavit no. 4181/2025 at Kolhapur.
0090375015-2

I, Pramila, wife of No. 2755838F, Rank- NK, Name- Vishwas Gopal Patade, Resident at Vill- Karpewadi, Teh- Ajara, Dist- Kolhapur 416220, have changed my name from Pramila to Pramila Vishwas Patade & my correct DOB is 01/06/1953 & not 15/11/1953 as per affidavit no. 617/2025.
0090375015-5

I, No-1572741M Ex- H/Nb/Sub Wadhai Waman Krushnaji residing at Nigdi, Pune- 411044 declared that my daughter have changed her name from Sayli to Sayli Waman Wadhai a vide Affidavit 5735/2025 of 17/04/2025
0040784661-1

I, No-13623622L Ex-NK Wagh Dinesh Vijay Singh residing at Aghar (Khurd), Teh-Malegaon Distt-Nashik declared that my son have changed his name from Divyanshu to Divyanshu Dinesh Wagh vide Affidavit 63/2025 of 16/04/2025
0040784663-1

I, Mangal, wife of No. 1056457K Ex Hav Redekar Balu Babu, Resident at PO- Mahagaon, Tal- Gadhinglaj, Dist- Kolhapur (MH) 416503, declare that my name changed from Mangal to Mangal Balu Redekar as per affidavit no. 337/2025 at Gadhinglaj.
0090375015-4

I, Mangal Mother of no - 15421424K. HAV. Barge Deepak Machhindra. That i have changed my name from Mangal to Mangal Machhindra Barge. & DOB - 03/06/1962 to 01/01/1965. Vide Affidavit no - 255274262126850109457 0 .Dated -15/04/2025
0090375026-2

I, Machendranath father of no - 15421424K. HAV. Barge Deepak Machhindra. That i have changed my name from Machendranath to Machhindra Laxman Barge. & DOB - 13/09/1956 to 18/06/1955. Vide Affidavit no - 255274262126850109456 9 .Dated -15/04/2025
0090375026-1

I, Geeta, wife fo No. 13937413X, Rank- Hony/Nb/Sub, Name- Yejare Shamrao Tukaram, Resident at Vill- Halewadi, Teh- Ajara, Dist- Kolhapur, have changed my name from Geeta to Geeta Shamrao Yejare as per affidavit no. 623/2025.
0090375015-6

I, Gita, wife of No. 4547110F Ex Hav Chandrakant Narayan Shirkar